आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.com




दैनिक
# लातूर प्रभात
E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २६३ वा ● मंगळवार दि. ०५ मार्च २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## वाशिमचा सेंद्रिय रथ मुंबईला रवाना ; मुख्यमंत्र्यांनी दाखवला हिरवा झेंडा



वाशिम : मुंबई येथे आयोजित सेंद्रिय उत्पादनांच्या विक्री स्टॉलसाठी वाशिम येथील कृषी विभागाचा सेंद्रिय रथ मुंबईला रवाना झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या सेंद्रिय रथाला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले.

'आत्मा'च्या बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण व शेतमाल विक्री केंद्राच्या लोकार्पण सोहळ्यादरम्यान हा सेंद्रिय रथ रवाना करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, खासदार भावना गवळी, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुंबईतील मंत्रालयाच्या मुख्य इमारतीतील त्रिमूर्ती प्रांगण येथे सेंद्रिय उत्पादनांचे विक्री स्टॉल उभारण्यात येत आहे. त्यासाठी वाशिमचा सेंद्रिय रथ रवाना करण्यात आला आहे.

## जळगाव जिल्हा 'वारकरी भवन' ला निधीची कमतरता पडू देणार नाही - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

जळगाव (जिमाका) : जळगाव सारख्या संताच्या भूमीत वारकरी भवन होत आहे. अशा या जिल्हास्तरीय वारकरी भवनला निधीची कमतरता पडू देणार नाही. अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या 'वारकरी भवन' चे भूमिपूजन खेडी (जळगाव) येथे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या भूमिपूजन सोहळ्यास ग्रामविकास व पर्यटन मंत्री गिरीष महाजन, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, खा. उन्मेष पाटील, खा रक्षा खडसे, आ. राजुमामा भोळे, आ किशोरआप्पा पाटील, आ.चिमणराव पाटील, आ.चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित, ह.भ.प.गजानन महाराज वरसाडेकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की,आज आपल्याला इथे आल्यावर वारकरी संप्रदाय भेटला आणि मनाला खूप आनंद झाला. आज उत्तर महाराष्ट्रामध्ये पहिल्या 'वारकरी भवन' चे भूमिपूजन होत आहे. या कामी ज्यांचे ज्यांचे हात लागले त्यांचे आभार आणि ज्यांचे लागणार आहेत सर्वांना या निमित्ताने मी मनापासून शुभेच्छा देतो.

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी विकासकामांसोबत अनेक प्रकल्प जिल्ह्यात आणले आहेत परंतू यात सर्वात महत्वाचे असे 'वारकरी भवन' बांधण्याचा त्यांचा निर्णय



अत्यंत चांगला असल्याचे सांगून प्रत्येक जिल्ह्यात वारकरी भवन बांधावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आपल्या राज्यात वारकरी संप्रदाय खूप मोठा आहे. तो गावोगावी अंखड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून, त्यातील कीर्तनाच्या माध्यमातून अतिशय दुर्गम भागात देखील पांडुरंगाचे नामस्मरण करुन मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधनाच काम तसेच जनजागृतीच काम करीत आहे. पंढरपुरचा विकास होत असतांना राज्यातील जेवढी तीर्थक्षेत्र आहेत, त्या सर्व तीर्थक्षेत्राचा विकास करण्याचे शासनाने ठरविले आहे. विशेष म्हणजे राज्यातील 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पामध्ये अडीच हजार कोटींची तरतुद केली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

असे आहे वारकरी भवन

प्रस्तावित जिल्हातील वारकरी भवन ५५ एकरांच्या भूखंडावर होणार असून त्याला सहा कोटी सहा लाख एवढा निधी अपेक्षित आहे. इथले वारकरी भवन इतर जिल्ह्यांसाठी मार्गदर्शक प्रकल्प ठरणार आहे. या वारकरी भवनास जिल्हा वार्षिक योजनेच्या नाविण्यपूर्ण योजनेतून ६ कोटी ६ लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला आहे. एकूण बांधकाम- १८१०.३८ चौ.मी. (तळ मजला) (टप्पा-१) वारकरी भवन पहिल्या टप्प्यात सभामंडप व भक्त निवास इमारत (मुख्य इमारत) प्रस्तावित आहे.

## महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे जानेवारीत काढलेल्या लॉटरीच्या मासिक सोडतीचे निकाल जाहिर

मुंबई, :- महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात ५ मासिक सोडती काढल्या जात असून जानेवारी-२०२४ महिन्यातील मासिक सोडतीचे निकाल जाहिर करण्यात आले आहेत. १३ जानेवारी २०२४ रोजी महाराष्ट्र सह्याद्री, दि. १७ जानेवारी रोजी महाराष्ट्र गौरव, दि. २० जानेवारी रोजी महाराष्ट्र गणेशलक्ष्मी न्यू इयर, दि. २४ जानेवारी रोजी महाराष्ट्र तेजस्विनी व दि. २८ जानेवारी रोजी महाराष्ट्र गजराज या मासिक सोडती काढण्यात आल्या आहेत.

त्यापैकी महाराष्ट्र सह्याद्री या विक्री झालेल्या तिकीटांमधून एकूण २ हजार ८६९ तिकीटांना एकूण ७ लाख १८ हजार ८०० रुपये किंमतीचे बक्षीस जाहीर झाले आहेत. महाराष्ट्र गौरव मालिका तिकिट क्रमांक ऋ-३८/३६२७ या मे. प्रिन्स एजन्सी, काळबादेवी, मुंबई कडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम ३५ लाख रुपयांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले आहे. या सोडतीच्या एकूण ६ हजार २४१ तिकीटांना एकूण रू.४३ लाख ८ हजार रुपये किंमतीचे बक्षीस जाहीर झाले आहेत. महाराष्ट्र गणेशलक्ष्मी न्यू इयर विक्री झालेले एकूण १ हजार ७०५ तिकीटांना एकूण ८ लाख ८७ हजार रुपये किंमतीचे बक्षीस जाहीर झाले आहेत. महाराष्ट्र तेजस्विनी मालिका तिकीट क्रमांक द्वा-०२/३२४१ या महाराजा लॉटरी सेंटर, इचलकरंजीकडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम २५ लाख रुपये किंमतीचे प्रथम क्रमांकाचे एक बक्षिस जाहीर झाले आहे. या सोडतीच्या एकूण ९१२ तिकीटांना एकूण ३१ लाख ७१ हजार ८०० रुपये किंमतीचे बक्षीस जाहीर झाले आहेत. महाराष्ट्र गजराज विक्री झालेल्या तिकीटांमधून एकूण २ हजार ६६० तिकीटांना एकूण २ लाख ९८ हजार ३५० रुपये किमतीचे बक्षीस जाहीर झाले आहे.

सर्व खरेदीदारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या वेबसाईटवर नमूद प्रक्रिया पूर्ण करून १० हजार रुपये वरील बक्षिसाची मागणी उपसंचालक (वित्त व लेखा) महाराष्ट्र राज्य लॉटरी या कार्यालयाकडे सादर करावी. रूपये १०, हजाराच्या आतील बक्षीस रकमेची मागणी विक्रेत्यांकडून करावी, असे उपसंचालक (वित्त व लेखा) महाराष्ट्र राज्य लॉटरी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### महाराष्ट्र राज्य लॉटरी; फेब्रुवारीमधील सोडतींचा निकाल जाहीर

मुंबई, :- महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात ५ मासिक सोडती काढल्या जात असून फेब्रुवारी-२०२४ मधील मासिक सोडती काढण्यात आलेल्या सोडतींचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये ९ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र सहयाद्री, १६ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र गणेशलक्ष्मी माघी गणपती, २० फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र तेजस्विनी, २१ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र गौरव आणि २४ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र गजराज या मासिक सोडतींचा समावेश आहे.

त्यापैकी महाराष्ट्र सह्याद्री या विक्री झालेल्या तिकीटांमधून ३ हजार ३० तिकीटांना एकूण ७ लाख ५८ हजार ५० रुपये किंमतीची बक्षिसे जाहीर झाली आहेत. महाराष्ट्र गणेशलक्ष्मी माघी गणपती या सोडतीच्या विक्री झालेल्या १ हजार ६८६ तिकीटांना ८ लाख ७० हजार ५०० रुपये किंमतीची बक्षिसे जाहीर झाली आहेत. महाराष्ट्र तेजस्विनी या सोडतीच्या विक्री झालेल्या ९३२ तिकीटांना ६ लाख १५ हजार ७०० रुपये किंमतीची बक्षिसे जाहीर झाली आहेत. महाराष्ट्र गौरव या सोडतीच्या विक्री झालेल्या तिकीटांमधून ६ हजार ९८१ तिकीटांना ९ लाख २७ हजार किंमतीची बक्षिसे जाहीर झाली आहेत. महाराष्ट्र गजराज या सोडतीच्या विक्री झालेल्या तिकीटांमधून २ हजार ५३३ तिकीटांना २ लाख ८९ हजार ४०० रुपये किंमतीची बक्षिसे जाहीर झाली आहेत.

लॉटरी तिकिट खरेदीदारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या संकेतस्थळावर देण्यात आलेली प्रक्रिया पूर्ण करून रुपये १० हजारवरील बक्षिसाची मागणी उपसंचालक (वित्त व लेख) महाराष्ट्र राज्य लॉटरी वाशी कार्यालयाकडे सादर करावी. तर १० हजाराच्या आतील बक्षीस रकमेची मागणी विक्रेत्यांकडून करण्यात यावी, असे उपसंचालक (वित्त व लेखा) महाराष्ट्र राज्य लॉटरी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात संपूर्ण स्वच्छता मोहीम राबवावी

मुंबई, : ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात पुढील एक महिना संपूर्ण स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी. मोहीम कालावधीत ग्रामीण भागात असलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावावी. महामार्गांच्या आजुबाजूला असलेला कचरा उचलून रस्ते स्वच्छ करावे, असे निर्देश राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी आज दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित स्वच्छता अभियान बैठकीत मंत्री श्री. देसाई बोलत होते. बैठकीला ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. स्वामी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता) व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## राज्यपालांच्या उपस्थितीत पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटचा दीक्षान्त समारंभ

**पुणे: जगातील यशस्वी सेवा उद्योग सुरुवातीस एक नवकल्पना होते, प्रयत्न आणि परिश्रमाच्या बळावर त्यांनी पुढे यश मिळविले. आज देशात अशा नवकल्पनांची निर्मिती करणारे, त्यांना चालना देणारे यशस्वी तरुण उद्योजक घडविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.**

पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझीनेस मॅनेजमेंटच्या १४ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला वीकफील्ड कंपनीचे कार्यकारी संचालक डी. एस. सचदेवा, आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराय मेत्री, पीआयबीएम ग्रुपचे अध्यक्ष रमण प्रीत आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री.बैस म्हणाले, नव्या पिढीने नवोन्मेषक, उद्योजक, नवप्रवर्तक आणि आव्हाने स्वीकारणारे व्यावसायिक व्हावे. त्यांच्यामध्येही एखादा मार्क झुकेरबर्ग दडलेला असेल. आज कुशल मनुष्यबळासाठी संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे आहे. जगातले अनेक देश व्यापारासाठी चीनला पर्याय शोधत आहेत. युवकांना कौशल्याचे आणि नवनिर्मितीचे प्रशिक्षण देवूनच देशाला या संधीचा लाभ घेता येईल.

देशाला विकसित राष्ट्र करण्याच्या या परिवर्तनकारी यात्रेत प्रत्येक स्नातकांने आपली भूमिका निभावण्याची गरज आहे. व्यवस्थापन शाखेचे विद्यार्थी आणि उद्योजकांनी जागतिक स्तराच्या लेखा परिक्षण आणि व्यवस्थापन संस्था तसेच सल्लागार संस्था उभाराव्यात. जागतिक दर्जाच्या कायदे विषयक सल्ला देणाऱ्या संस्था आपल्या देशात तयार व्हाव्यात. संपत्ती निर्माण करणारे आणि स्टार्ट अप्सचे प्रवर्तक



स्नातक भारतीय विद्यापीठांमधून घडावेत, अशी अपेक्षा राज्यपाल श्री. बैस यांनी व्यक्त केली.

देशातील ५० टक्क्यापेक्षा अधिक रोजगार कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, फलोत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी आहेत. कृत्रिम बुद्धीमत्ता शिक्षण, आरोग्य आणि इतर सेवा क्षेत्रांना प्रभावित करणारे आहे. व्यवस्थापन स्नातक आणि व्यवसाय व्यवस्थापकांनी देशाच्या विकासासाठी एआय शक्तीचा उपयोग करण्यात भारताला अग्रेसर ठेवावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पदवीदान समारंभात एमबीएच्या ३२३ व पीजीडीएमच्या ३५९ अशा एकूण ६८२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. विविध अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना राज्यपालांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात सुवर्णपदक आणि पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

प्रारंभी इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष रमन प्रीत यांनी प्रास्ताविकात संस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली. यावेळी संस्थेतील प्राध्यापक, पालक, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी सुरक्षागृह

मुंबई, : मुंबई उपनगर जिल्ह्यात



आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना शासनातर्फे सुरक्षा गृह पुरवण्यात येणार असल्याची माहिती मुंबई उपनगरचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बी.एच.नागरगोजे यांनी दिली. सुरुवातीला एक महिन्यासाठी नाममात्र शुल्कावर सुरक्षागृह उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानंतर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता जास्तीत - जास्त एका वर्षापर्यंत सुरक्षागृह उपलब्ध करून देण्यात येईल. या सुरक्षागृहाची व्यवस्था समाज कल्याण विभागामार्फत पुरवण्यात येणार आहे. उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

तरी ऑनर किलींग प्रकरणात त्रस्त असणाऱ्या जोडप्यांनी या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांनी शेततळे योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

मुंबई, : मुख्यमंत्री शाश्र्वत कृषी सिंचन योजना - वैयक्तिक शेततळे (मागेल त्याला शेततळे) घटकाकरिता सन



२०२३-२४ मध्ये शासनाकडून ८० कोटी रुपये निधी उपलब्ध झाला असून आतापर्यंत ७ हजार ३१६ शेततळ्यांकरिता शेतकऱ्यांना ५०.८१ कोटी रुपये अनुदान देण्यात आले आहे. तसेच १ हजार ६६५ शेतकऱ्यांचे अनुदान देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

या योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळेकरिता शासनाकडून आणखी २० कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेततळे खोदकामासाठी ७५ हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. तसेच शेततळ्यास प्लॅस्टीक अस्तरीकरण करण्यासाठी ७५ हजार रुपयांपर्यंत वेगळे अनुदान देण्यात येते. या योजनेची अंमलबजावणी महा डीबीटी पोर्टलवरुन करण्यात येते. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याकरिता आपल्या गावातील कृषी सहाय्यक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे अवाहन संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केले आहे.

## ठाणे जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात हेलिपॅड उभारावे-मंत्री शंभुराज

मुंबई, : ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी हेलिपॅड उभारण्यात यावे. हेलिपॅडचे काम दर्जेदार असावे. अत्यावश्यक काळात या हेलिपॅडचा उपयोग सहजरित्या करता आला पाहिजे. हेलिपॅडला संरक्षण भिंत निर्माण करुन हेलिपॅडसाठी उच्च प्रतीच्या पेव्हर ब्लॉकचा उपयोग करण्यात यावा. तसेच आजुबाजूला डांबरीकरण करावे, असे निर्देश उत्पादन शुल्क मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे हेलिपॅड निर्मितीबाबत बैठकीचे आयोजन मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. त्यावेळी मंत्री श्री. देसाई बोलत होते. या बैठकीला ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.



स्वामी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आदी उपस्थित होते. हेलिपॅडसाठी शासकीय जमीन शोधून त्याच ठिकाणी काम सुरू करावे. ज्या तालुक्यात गायरान जमीन उपलब्ध आहे, अशा ठिकाणी पुढील एक महिन्यात हेलिपॅडचे काम सुरू करावे. ज्या तालुक्यात हेलिपॅड उभारणी होणार नाही, संबंधित तालुक्याच्या प्रांताधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्र्चित करण्यात येईल, अशा सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी यावेळी दिल्या.

## 'लेक लाडकी' योजनेसाठी १९ कोटी ७० लाखांचा निधी वितरित

मुंबई, : मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी' ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पिवळ्या व केशरी रेशन कार्डधारक कुटुंबात जन्माला आलेल्या मुलींना जन्मानंतर अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी १९ कोटी ७० लाखाचा निधी वितरित करण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी दिली.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, नवी मुंबई मार्फत ३६ जिल्हयांना १९.७० कोटी (रुपये १९ कोटी ७० लाख) वितरित करण्यांत आले याबाबत जिल्हा स्तरावर जिल्हा निहाय व तालुका स्तरावर कॅम्प आयोजित करुन १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या मुलींना लाभ देण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यांत येत आहे.

आतापर्यत जवळपास ३५ हजार प्रस्ताव जिल्हा कार्यालयात प्राप्त झालेले असून पुढील १५ दिवसांत तालुका निहाय / जिल्हा निहाय कॅम्प आयोजित करण्यांत येत असून पात्र लाभार्थीनी जवळच्या बाल विकास प्रकल्प कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन मंत्री कु. तटकरे यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत पिवळया व केशरी शिधा पत्रिकाधारक कुटुंबात जन्मलेल्या मुलीना लाभ दिला जाईल. मुलींच्या जन्मानंतर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ६ हजार रुपये, सहावीत ७ हजार रुपये, अकरावीत ८ हजार रुपये तर लाभार्थी मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये याप्रमाणे एकूण रुपये १,०१,०००/- एवढी रक्कम देण्यात येईल.

ही योजना दिनांक १ एप्रिल २०२३ रोजी वा त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन मुलींना लागू राहील, तसेच एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. १ लक्ष पेक्षा जास्त नसावे.

## ख्यातनाम चित्रकार प्रकाश बाळ जोशी यांच्या 'रिव्हर रिटर्न्स' या चित्रप्रदर्शनास उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची सदिच्छा भेट

मुंबई, : नित्या आर्टिस्ट सेंटर पुनर्निर्मीत आर्टस गॅलरीज येथे



विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सदिच्छा भेट दिली. सध्या येथे ख्यातनाम चित्रकार प्रकाश बाळ जोशी यांचे रिव्हर रिटर्न्स हे अमूर्त चित्रकारितेचे प्रदर्शन सुरू आहे.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सर्व चित्रांचे तपशीलवार रसग्रहण केले व भारतीय अमूर्त चित्रकारितेची गौरवशाली परंपरा प्रकाश बाळ जोशी हे समर्थपणे सांभाळत आहेत, असे सांगून भेटी प्रसंगी श्री. जोशी यांचे अभिनंदन करुन सत्कार केला.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत ९५ लाख ६४ हजार ६१३ बालकांना पोलिओचा डोस

मुंबई, : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत



रविवारी ३ मार्च रोजी राज्यातील ० ते ५ वर्षांपर्यंतच्या ९५ लाख ६४ हजार ६१३ बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला. आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी राज्यातील जनतेला आपल्या ५ वर्षाखालील सर्व बालकांना पोलिओचा डोस देण्याबाबत आवाहन केले होते. राज्यात एकूण ८९,२९९ बुथ व ट्रान्झिंट टिम २७,५५३ फिरती पथक १५,४३० व रात्रीचे पथक ६४२ याद्वारे ० ते ५ वर्ष वयोगटातील ९५,६४,६१३ बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला आहे. यानंतर ग्रामीण भागात ३ दिवस व शहरी भागात ५ दिवस (आय.पी.पी.आय.) राबविण्यात येणार असून घरोघरी जाऊन सुटलेल्या बालकांचे लसीकरण करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय सनियंत्रण अधिकारी यांची नेमणूक करुन त्यांच्या मार्फत सर्व जिल्हा व मनपा या मोहिमेचे पर्यवेक्षण करण्यात आले. तसेच जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात आली व त्यांच्यामार्फत मोहिमेचे पर्यवेक्षण करण्यात आले. सर्व शासकीय विभाग, अशासकीय संस्था, जागतिक आरोग्य संस्था, युनिसेफ, जे. एस.आय., आय.एम. आय. आय. ए.पी. स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाने मोहीम १०० टक्के यशस्वी होण्यासाठी मदत झाली. देशात पोलिओ निर्मूलन कार्यक्रमाचे अंतर्गत सन १९९५ पासून पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यांत येत आहे. दिनांक ३ मार्च २०२४ रोजी राज्यात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओची अतिरिक्त मात्रा देण्यात आली आहे. दि. २७ मार्च २०१४ रोजी जागतिक आरोग्य संघटनेने भारत देश पोलिओ मुक्त असल्याचे प्रमाणित केले आहे. पोलिओग्रस्त असणाऱ्या देशांमधून स्थलांतरामुळे देशात पोलिओ रुग्ण आढळण्याच्या धोका उद्भवू शकतो. यासाठी पोलिओ निर्मुलनाकरिता पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अत्यंत प्रभावीपणे अंमलात आणणे आवश्यक आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## भोकर येथे महाशिवरात्रीनिमित्त यात्रा : विविध कार्यक्रमांचे आयोजन

भोकर– येथील ग्रामदैवत पुरातन महादेव मंदिराच्या प्रांगणात महाशिवरात्रीनिमित्त ८ते ११ मार्च २०२४ दरम्यान भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले असून कृषी व पशुप्रदर्शन, कबड्डीचे सामने, कीर्तनाचे कार्यक्रम व महाराष्ट्रातील नामवंत पहेलवानांच्या कुस्त्या होणार आहेत.

भोकर शहराचे ग्रामदैवत म्हणून प्रसिद्ध असलेले पुरातन काळातील महादेव मंदिराच्या प्रांगणात दरवर्षीच महाशिवरात्रीनिमित्त यात्रा भरत असते चालू वर्षी८ मार्च ते ११ मार्च २०२४ दरम्यान यात्रा भरणार असून ८ मार्च २०२४ रोजी कृषी व पशु प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी,उद्घाटक तहसीलदार सुरेश घोळवे, प्रमुख अतिथी कार्यकारी अभियंता सा. बां.विभाग प्रशांत कोरे, पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड, गटविकास अधिकारी माधव केंद्रे, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतीक मोडवान, तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव आदींची उपस्थिती लाभणार आहे महाशिवरात्री निमित्त रात्री १२ वाजता महादेवाची महापूजा व अभिषेक होईल ९ व १० मार्च रोजी कबड्डीचे सामने होतील ९ मार्च रोजी रात्री८ ते १० या वेळात शब्द साधक ह.भ.प. अविनाश दादा भारती घाटनांदुर यांचे कीर्तन होईल १० मार्च रोजी रात्री ८ ते १० या वेळामध्ये रामायणाचार्य ह.भ. प .वैजनाथ महाराज थोरात हिंगोली यांचे कीर्तन होईल ११ मार्च रोजी भव्य कुस्त्यांची दंगल होणार असून महाराष्ट्रातील नामवंत पहिलवानांची हजेरी लाभणार आहे, प्रथम बक्षीस ५१ हजार रुपये, द्रितीय बक्षीस ४१ हजार रुपये, तृतीय बक्षीस , ३१हजार रुपये, चतुर्थ बक्षीस २१ हजार रुपये, पाचवे बक्षीस १५ हजार रुपये, सहावे बक्षीस १२ हजार ५०० रुपये, सातवे बक्षीस ११ हजार रुपये, आठवे बक्षीस ९ हजार रुपये ,नववे बक्षीस ७ हजार रुपये, दहावे बक्षीस५हजार ५००व अकरावे बक्षीस ५ हजार रुपये राहणार आहे यात्रेतील सर्व कार्यक्रमांचा भाविकभक्त व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटीचे अध्यक्ष नागनाथराव घीसेवाड, उपाध्यक्ष भगवानराव दंडवे, कोषाध्यक्ष दिलीपराव सोनटक्के, सचिव बी. आर. पांचाळ, संघटक सतीश देशमुख, आकाश गेंटेवार व सर्व यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## लातूर ग्रंथोत्सव'चे थाटात उद्घाटन

लातूर, (जिमाका): ग्रंथ हे आपल्याला भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळविषयक ज्ञान देतात. आपली संस्कृती, समाजाची जडणघडण ग्रंथांमुळे समजते. त्यामुळे ग्रंथ हे मानवी जीवनात मार्गदर्शकाची भूमिका बजावितात, असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी केले. दयानंद सभागृहात लातूर ग्रंथोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य व लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लातूर ग्रंथोत्सवचे उद्घाटन ग्रंथालय चळवळीचे प्रणेते डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी, वात्रटिकाकार भारत सातपुते हे होते. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के, ज्येष्ठ साहित्यिक रमेश चिल्ले, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर, विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले, जिल्हाध्यक्ष प्रभाकर कापसे, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, साने गुरूजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कालिदास माने आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मानवी जीवनात प्रगतीचे विविध टप्पे आले. या सर्व टप्प्यांचे ग्रंथ हे साक्षीदार आहेत. आपली संस्कृती, सभ्यता विकसित होण्यामध्ये ग्रंथची भूमिका महत्वाची राहिली आहे. आपल्या विचारांची जडणघडण होण्यामध्ये ग्रंथ दिशादर्शक ठरतात. त्यामुळे प्रत्येकाने ग्रंथ वाचनाची आवड जोपासली पाहिजे. ग्रंथोत्सवासारखे उपक्रम हे वाचन चळवळ वाढविण्यासाठी आणि युवा वर्गात वाचनाची गोडी वाढविण्यासाठी आवश्यक असल्याचे श्री. बियाणी यावेळी म्हणाले.

आयुष्यात ग्रंथ हा महत्वाचा घटक आहे. ग्रंथांशी घट्ट मैत्री केल्यास आपल्याला जगण्याचे बळ, नवी दिशा आणि नव्या प्रेरणा मिळतात. त्यामुळे आयुष्यात इतर अनावश्यक बाबींपेक्षा ग्रंथ वाचनाला अधिक महत्व दिले पाहिजे, असे कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी भारत सातपुते यांनी सांगितले. यावेळी त्यांनी आपल्या जीवनातील ग्रंथांची भूमिका विषद केली.

वाचकांची मानसिकता बदलत असून वाचन चळवळ वाढविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाने स्वतःपासूनच ग्रंथ वाचनाची आवड जोपासण्यास सुरुवात करावी. प्रत्येकाच्या अभिरुचीनुसार ग्रंथ वाचनालयात उपलब्ध करून द्यावे लागतील. ग्रंथालय हे केवळ पुस्तकालय न बनता ग्रंथालयांनी वाचन प्रसारासाठी नवनव्या उपक्रमांशी जोडून घ्यावे. आव्हाने सर्वच क्षेत्रात आहेत, वाचन चळवळ त्याला अपवाद असण्याचे कारण नाही, असे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर यावेळी म्हणाले.

युवा पिढीला वाचनाची गोडी लावण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांमार्फत गावोगावी उपक्रम राबविले जावेत. या ग्रंथालयांनी वाटाड्याची भूमिका निभावत वाचक घडवावेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाल्यास वाचन चळवळ वाढीस लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तिकांसोबत इतरही वाचनासाठी प्रोत्साहित करावे, असे बाल साहित्यकार रमेश चिल्ले यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी केले. यामध्ये त्यांनी ग्रंथोत्सवाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पी.सी. पाटील यांनी तर आभार प्रदर्शन हरिश्र्चंद्र डेंगळे यांनी केले. ग्रंथोत्सवाच्या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले. यामध्ये विविध प्रकाशनांच्यावतीने ग्रंथदालने उभारण्यात आली आहेत. या ग्रंथदालनामधून विविध प्रकारचे ग्रंथ विक्रीसाठी उपलब्ध आहेत .

# गरीबी कोठे आहे, ते सांगाल ?

**संपादकीय...**

स्वातंत्र्याची पंचाहत्तरी ओलांडली असतानाही गरीब गरीब म्हणून जे लोक-विरोधी पक्षनेते ओरडत असतात त्यांनी १९६७ गरिबी हटावो असा नारा दिलेला आठवत असेलच पण आज वास्तवात गरिबी आणि गरीब असा कोणीच राहिलेला नाही हे गेल्या दहा वर्षातील भारताच्या केंद्रीय भारत सरकारच्या कारभारावरून स्पष्ट झालेले दिसतच असताना कोणीतरी कालचे बाद झालेले विरोधक काहीतरी वावड्या उडवीत असतील तर त्यांची खैर नाही असा सरकारी दावा खरा की खोटा हे समजण्या पलीकडचाच वाटेल यात संदेह नसावा.

हाताला काम आणि दाम मिळावा म्हणून बेरोजगार कामगार देशातील शहरा शहरात समूहाने, थव्या, थव्याने काम शोधत असतील कोणी वेटबिगार म्हणून राबवत असतील, कोणी गुलाम बनून मालदार व्यापारी- उद्योजकाच्या घरी चाकरी करीत असतील तर त्यांना काही मिळेल, मिळाले असेल पण ते उपाशी- तापाशी जगतच असतात तेच खरे मतदार असल्याचेच लोकशाही आणि शासन –प्रशासन कार्यरत आहे हे विसरता कामा नये ही विद्यमान सरकारची भूमिका असतानाही विरोधक मात्र देश गरीबीच्या खाईत लोटला जातो आहे अशी ओरड कलतात तीच चुकीचे वाटते हा सरकारी दावा असला तरी गरिबी कोठे आहे हे सांगाल काय ? याचे उत्तर कोणीच देत नाही. म्हणूनच उद्याच्या उज्वल भवितव्यासाठी चक्क राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपा, हिंदू महासभा, विविध, अभाविण वैगरे संस्था–राजकीय पक्षांना बाजूला सारून केवळ नरेंद्र मोदी यांनाच मते द्यावीत आणि उद्याचा भारत अर्थसत्ता बनावा अशी अपेक्षा बाळगणे चुकीचे नसतानाही विरोधी पक्ष नेते गरीब गरीबच म्हणून भारताची नाचक्की करीत आहेत. हाच मुद्दा उचलून गरीबी कोठे आहे हे तरी सांगाल काय ? असा सरळ स्पष्ट सवाल नरेंद्र मोदी हे त्यांच्या बगलच्याच असलेल्या अमित शहा, निर्मल सीतारामन आणि राजनाथ सिंह यांच्या तोंडून सांगत असतील आणि स्मृती इराणी हसून- हसून त्यांना दाद देत असतील तर विरोधकाचे काय दुखते हाच प्रश्न प्रसारमाध्यमा समोर पडलेला दिसत असून राजकीय समीक्षाक मात्र तोंडात बोट घालून हे काय चालले आहे असेच एकमेकांना विचारत असावेत अशीच परिस्थिती निर्माण झाल्याची दिसते आहे.

भारतीय सत्ताकारणाबद्दल बोलताना–लिहिताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे कारण एक व्यक्ती–प्रधानमंत्री भारतातील कोणत्या दशा –दिशा–अत्याचार–बलात्कार होतच असतात. मग कालची कविता असेल किंवा उद्याची स्वार्थी असेल पण त्यांची –त्यांनी पाहिली पाहिजे कारण केंद्र सरकारमध्ये कार्यरत असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुरूम, निर्मला सीतारामन, इराणी, हेमा मालिनी, जयाप्रदा, जया बच्चन वगैरे महिला सुरक्षित असताना भारतातील घरगुती महिला सुरक्षित कशा राहू शकत नाहीत त्या अबला की गरीब असे ठरविण्यातच येत नाही असा दावा करून उद्याची सत्ता काबीज करण्यासाठी गरिबी म्हणजे काय हे सांगाल काय असा सवाल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रधान कार्यालयाने विचारलं तर त्याचे उत्तर कोण देणार हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

तत्कालीन काँग्रेस-डाव्या सरकारने गरिबी हटाव घोषणा दिली ती कितपत यशस्वी झाली प्रश्न नाही परंतु आम्ही बेरोजगारी हटावी म्हणून महा रोजगार मिळावे, हजारो सुशिक्षित बेरोजगारांना काम देण्याची प्रतिक्रिया अवलंबिली ती पुढील काळात कार्यान्वीत होईलच त्यामुळे सुशिक्षित बेकारासह बेरोजगाराचे प्रश्न मिटतील, गरिबी नावाला नैवेद्याला ही उरणार नाही, शिल्लक राहणार नाही, अशी भारत सरकारची–प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची कार्यप्रणाली असताना विरोधमात्र नाहाक टीका करून मोदी सरकारला बदनाम करीत आहेत त्याचे कारण काय आणि गरिबी कोठे आहे ते सांगाल काय, असाच खडा सवाल चक्क राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपा आणि त्यांच्या बाहूल्यातूनच उपस्थित केला जात असल्याने विरोधी पक्षाच्या नेत्याचे–कार्यकर्त्याचे कार्य त्याच्याच समूहातून होत असल्याचेच कालचा महासत्ता भारत आणि उद्याचा अर्थसत्ता भारत त्याचे स्रोत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हेच जाणतो पण विरोधकाची बाजू मोदी आणि त्यांचा चमु प्रबळ करीत असल्याने मोहन भागवत नाराज असल्याची त्याचे काय?

# जंगम समाजातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या प्रतिभावान विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी समाजाने पुढे यावे : डॉ. मल्लिकार्जुन महास्वामीजी

**लातूर : जंगम समाजातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या प्रतिभावान विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी समाजाने स्वतःहून पुढे यावे. त्यांच्या माध्यमातून आपल्या समाजाचे अनेक उच्च पदस्थ अधिकारी राष्ट्र आणि समाजाच्या सेवेत सहभागी होऊ शकतात असे प्रतिपादन काशीपीठाचे जगदगुरु श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्र्वाराध्य महास्वामीजी यांनी केले.**

लातूर सकल जंगम समाजाच्या वतीने लातूर जिल्ह्यातील भूमिपुत्र अधिकाऱ्यांचा गौरव आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात उपस्थितांना आशिर्वचन करताना जगद्गुरु बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे ह्या होत्या. या सोहळ्यास हिरेमठ संस्थान औसाचे श्री श्री १०८ डॉ. शांतविरलिंग शिवाचार्य स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, आयकर सह आयुक्त डॉ. शांतेश्र्वर स्वामी, पोलीस अधीक्षक हरेश्र्वर स्वामी, आयइएस धानेश स्वामी, प्रशांत स्वामी, उपमहालेखाकार शुभम स्वामी, केंद्रीय रेल्वेचे उपमुख्य अभियंता शिवकुमार मळभागे , उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, डॉ. रवींद्र मठपती, पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी,न्या. संदीप स्वामी, कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी, उपसंचालक रविशंकर सावळे, तहसीलदार सौ. सुरेखाताई स्वामी, डॉ. गणेश स्वामी, डॉ. सचिन बालकुंदे, डॉ. महेश अरदाले, डॉ.अरुण बालकुंदे, डॉ. रुद्रमणी स्वामी, डॉ. बसवराज स्वामी, सहायक कार्यकारी अभियंता सुरज स्वामी, इंजि. शांतनू कोळळे , जीएसटी सहायक आयुक्त आनंद स्वामी, सहायक शिक्षण संचालक दत्तात्रय मठपती, कक्ष अधिकारी सौ. स्नेहा सावळे जेवरे, उपविभागीय



अभियंता अमित स्वामी, सायक अभियंता प्रसाद स्वामी, सहायक अभियंता सौ. शिवनंदा स्वामी यांचा जगद्गुरु तसेच मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

आपल्या आशिर्वचनात जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्र्वाराध्य महास्वामीजी पुढे म्हणाले की, प्रत्येकाने आपल्या व्यस्ततेतून समजला शक्य तेवढा वेळ काढण्याचा प्रयत्न करावा. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना आपल्या समाजाप्रती असलेली तळमळ पाहून अत्यंत समाधान वाटले. उच्च पदावर कार्यरत असतानाही कोणताही गर्व नाही. समाजासाठी सतत काहीतरी करण्याची धडपड सर्वांना प्रेरित करून गेली. समाजाने आपल्याला काय दिले असे म्हणण्याऐवजी समाजासाठी आपण काय केले ? हा विचार पुढे यायला हवा,तरच समाज प्रगतीपथावर जाऊ शकतो. केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोगासारख्या स्पर्धा परीक्षेत समाजातील मुले जास्तीत जास्त संख्येने पुढे आली पाहिजेत. त्यांना समाजाने मदत करण्यासाठी पुढे आले पाहिजे. जंगम समाज आर्थिकदृष्ट्या सदृढ नाही, ७५ टक्के समाज गरीब आहे. गरिबीमुळे होतकरू विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधकारमय होणार नाही याची जबाबदारी समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे. यासाठी वर्षातून दोन तीन वेळा एकत्रित येऊन विचारविनिमय व्हावा. या पुरस्काराने समाजाचे ऋण आपल्यावर अधिक पडले आहे याची जाणीव ठेवून कार्यरत रहावे असे आवाहनही त्यांनी केले.

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना आपल्याला राज्यभरातील जंगम समाजाच्या होतकरू, प्रतिभावान विद्यार्थ्यांना एमपीएससी, यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करण्याची इच्छा असल्याचे सांगितले. केवळ प्रशासकीय क्षेत्रात जाऊ इच्छिणारेच नव्हे तर उद्योजक म्हणून यशस्वी होऊ इच्छिणाऱ्यांनाही आपण याबाबतीत सहकार्य करण्यास तयार आहोत. आपला समाज प्रगतीपथावर कसा जाईल याकरिता आपण सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले. आजघडीला समाज सामाजिक तत्त्वापासून दूर चालला आहे. नव्या पिढीला धर्माच्या आचरणाकडे वळण्यास प्रवृत्त करणे आवश्यक आहे. भावी पिढीला धर्माच्या ज्ञानासह अभ्यासही असणे आवश्यक आहे. आपण अनेक ग्रंथांचे पारायण करतो, संतांचे विचार कोणत्या ग्रंथात काय आहे, हे नव्या पिढीला सांगितले पाहिजे. भावी पिढीला धर्माचे आचरण, शिकवण देणे खूप महत्वाचे आहे याकामी पुढाकार घेणाऱ्यांना सहकार्य केले पाहिजे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावेत. लातूर जिल्हा जंगम समाजाचे काम अत्यंत उल्लेखनीय आहे. शिवपाठावर लिहिलेल्या आपल्या पुस्तकात शिवपाठ नामस्मरणाचे वैज्ञानिक महत्व मांडण्याचा प्रयत्न केला आहे. नामस्मरणाचे एक आगळे वेगळे महत्व विशद करण्याचा प्रयत्न आपण केल्याचे स्वामी सांगितले.

शांतविरलिंग शिवाचार्य स्वामी यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची पार्श्र्वभूमी थोडक्यात विशद केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुधीर मठपती यांनी केले. अध्यक्षीय समारोपात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी लातूर जिल्हा सकल जंगम समाजाच्या वतीने अत्यंत सर्वांगसुंदर कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. समाजाच्या सर्वंकष प्रगतीसाठी समाजातील सर्वच स्तरातील नागरिकांनी एकत्रित येणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिवकांत स्वामी गुरुजी यांनी तर आभार प्रदर्शन नागेश स्वामी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उद्योजक श्रीकांत हिरेमठ, जगदीश स्वामी, चंद्रशेखर स्वामी हुंडेकरी, सुभाष स्वामी देवणीकर , नागेश स्वामी मानखेडकर, प्रा. सुधीर मठपती, अजित मठपती, डॉ. सचिन बालकुंदे, सुहास स्वामी, इंजि. विवेक स्वामी, डॉ. संजय स्वामी, डॉ. शिवाजी काळगे, संतोष स्वामी यांसह समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

# मनपाचे शिलकी अंदाजपत्रक सादर विविध मूलभूत गरजांसाठी मोठी तरतूद

लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेचे सन २०२३–२४ चे सुधारित आणि २०२४–२५ चे मूळ अंदाजपत्रक मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी सोमवार दिनांक ४ मार्च रोजी जाहीर केले. आयुक्तांनी सादर केलेल्या या शिलकी अंदाजपत्रकात विद्युत विभाग,बांधकाम विभाग, आरोग्य विभाग तसेच पाणीपुरवठा विभागासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे.

आयुक्त मनोहरे यांनी सादर केलेल्या या अंदाजपत्रकात पालिकेला यावर्षी ८३९ कोटी ८३ लक्ष रुपये उत्पन्न अपेक्षित असून या वर्षात ८३९ कोटी ५८ लक्ष रुपये खर्च होणार आहे.

यावर्षी मनपाने सादर केलेल्या अंदाजपत्रकात विद्युत विभागातील साहित्य खरेदी व देखभाल दुरुस्तीसाठी ४० लाख रुपये तसेच पथदिवे व वीज बिलासाठी २ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.शहरात एलईडी दिवे बसवण्यासाठी ५० लाख तर ट्रॅफिक सिग्नल देखभाल व दुरुस्तीसाठी १५ लाख रुपयांची तरतूद मनपाने केली आहे. रुग्णालय व दवाखान्यांसाठी ३१ लाख खर्च अपेक्षित आहे. मोकाट जनावरांच्या बंदोबस्तासाठी कोंडवाड्यावर ६६ लाख ५० हजार रुपये खर्च केला जाणार आहे तर सार्वजनिक उद्यानासाठी एक कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बांधकाम विभागात रस्ते व गटार दुरुस्तीसाठी दोन कोटी, शैक्षणिक विषयासाठी दोन कोटी ७४ लाख ८० हजार रुपये तर ग्रंथालयांसाठी दोन कोटी २४ लाख २० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अपंग कल्याण निधी महिला व बालकल्याण तसेच मागासवर्गीय दुर्बल घटकांसाठी अंदाजपत्रकाच्या पाच टक्के म्हणजे प्रत्येकी ६६ लाख ७३ हजार ४४३ रुपये तरतूद केली गेली आहे.नवीन रस्त्यांसाठी दोन कोटी रुपये, नवीन गटारांची कामे व दुरुस्तीसाठी दोन



कोटी तसेच मान्यवरांचे पुतळे व कमानी उभारणे तसेच त्याची निगा राखण्यासाठी २५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.पंपिंग केंद्रावरील साहित्य खरेदीसाठी १५ लाख रुपये,नवीन पाईपलाईनसाठी ५० लाख रुपये तर पाणीपुरवठा योजनेसाठी ही ५० लाख रुपये तरतूद मनपाने केली आहे.

पालिकेला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नामध्ये केंद्र शासनाच्या विविध अनुदानाचा वाटा ३५ टक्के तर राज्य शासनाकडून होणारी भांडवली जमा १७ टक्के अपेक्षित आहे.त्या खालोखाल कर्ज व निधीच्या माध्यमातून ११ टक्के, मालमत्ता पासून होणारे उत्पन्न ९ टक्के, विविध अनुदाने व अंशदानामधून सात टक्के तर पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या माध्यमातून सहा टक्के उत्पन्न अपेक्षित आहे. मनपाला मिळणाऱ्या करामधूनही सहा टक्के उत्पन्न गृहीत धरण्यात आले आहे.असाधारण ऋण व निलंबन जमा मधून पाच टक्के तसेच विशेष अधिनियमाखाली होणाऱ्या वसुलीतून दोन टक्का रक्कम जमा होणार आहे.

या वर्षात पालिका केंद्र शासनाचे विविध अनुदान खर्च करणार असून त्याचे प्रमाण ३३ टक्के आहे. त्या खालोखाल राज्य शासनाच्या भांडवली खर्चासाठी १९ टक्के खर्च होणार आहे.कर्ज व निधीसाठी ११ टक्के, असाधारण ऋण व निलंबन लेखेसाठी सहा टक्के खर्च होणार आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागासाठी पाच तर महसुली भांडवली खर्चासाठी चार टक्के खर्च केला जाईल.या खालोखाल तीन टक्के संकीर्ण खर्च,सार्वजनिक सुरक्षिततेसाठी एक टक्का खर्च होणार आहे. आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी अंदाजपत्रक सादर करताना मुख्यलेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, मुख्य लेखापरीक्षक कांचन तावडे, लेखाधिकारी, समद शेख यांच्यासह पालेकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

आवेश ..
गरजते भीमगर्जना
भरला कसाआवेश
बाकीपक्ष किडेमुंगी
करू पाही नामशेष
औषधा पुरते काही
ठेवावे जरा अवशेष
ठरवूनि घेण्यासिमा
मारावी एखादी रेष
आतला आत्मा तोचं
कितीदा बदली वेश
पाहुणे सगळे प्रबल
करून घेती समावेश
आधी मित्र बनवण्यां
पाठवले तंबूत संदेश
नंतर बळजबरी करी
ललकारी देई आदेश
आपल्या छत्र छायेत
आणा प्रत्येक प्रदेश
दामनिती अनुसरून
भरून काढे अनुशेष
दंड देती उरलेल्यास
बनावे सर्वोच्च नरेश
कुटीलराजकारणात
सदैव ते अभिनिवेश

२)
जागा वाटप..
जागा वाटप सु सूत्र
खेळ नाही हा सादा
समतोल जमेलतसा
सुवर्ण मध्य रे साधा
कारण असो कुठले
हव्या जागा ज्यादा
वरुन सगळेचं शांत
आतला हरामजादा
तयारी आत्तापासून
तपासा हरेक योध्दा
आराखडा हो तयार
उपयोगी पडे युध्दां
बंडखोरी पुन्हा नको
उडवी आपली त्रेधा
घोर लावील जीवाले
मनस्थिती होई द्विधा
वज्रमुठ पडेल ढिली
निष्प्रभ बसेलं गुद्दा
नाका खालून नेतीलं
पुन्हा पुन्हश्र्च तो गधा
प्रत्येकजणांला प्रिय
रे वरिष्ठ श्रेष्ठतम हुद्दा
विसरुन ती लायकी
समजे स्वताला दादा
माणूसकी महत्वपूर्ण
नंतर सांभाळा गद्दा
रे करण्यात गुद्दा गुद्दी
विसरुन चाललो मुद्दा

**- हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६...**

### दयानंद विज्ञान महाविद्यालयात बायोइन्फॉर्मेटिक्समधील मूलभूत साधने या विषयावर तीन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन

लातूर: येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग व मायक्रोबायोलॉजीस्ट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०४ मार्च २०२४ ते ०६ मार्च २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या बायोइन्फॉर्मेटिक्समधील मूलभूत साधने या विषयावरील तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन झाले.या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.आशिष गुळवे,सहाय्यक प्राध्यापक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र,लातूर व संसाधन व्यक्ती प्रा.नागेष मुर्गे,सहाय्यक प्राध्यापक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र,लातूर,सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख व कार्यशाळा समन्वयक डॉ.राहुल मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ.आशिष गुळवे यांनी सदरील तीन दिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण साधन व त्यांचा वापर कशा पद्धतीने महत्त्वाचा आहे,याबद्दल मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी या ज्ञानाचा उपयोग भविष्यात संशोधनामध्ये करावा, असे सांगितले तर अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी या कार्यशाळेतील ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांनी जास्तीत-जास्त करून घ्यावा व त्या ज्ञानाचा प्रसार करावा तसेच नाविन्यपूर्ण साधन व त्याचा वापर कुठे आणि कशा पद्धतीने करावा,याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले. प्रास्ताविकातून सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे यांनी कार्यशाळेचा आढावा व महत्त्व सांगितले तर आभार डॉ.दीप्ती ढेरे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.अनुराधा इंगळे यांनी केले.याप्रसंगी प्रा.शितल पाटील,प्रा.शैलजा धुतेकर,प्रा. संध्या टेकाळे, डॉ.गोमारे,प्रा.दीपाली देशमुख,संतोष सूर्यवंशी,अशोक मदने,माधव सूर्यवंशी,शकुंतला हालसे यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयातील पदव्युत्तर सूक्ष्मजीवशास्त्र,जैवतंत्रज्ञान वषयाचे एकूण ५५ विद्यार्थी उपस्थित होते.

# राज्यातील जनतेच्या जीवनात सुख, समाधान यावे असेच शासनाचे धोरण

**मुंबई, :- महाराष्ट्राच्या जनतेच्या जीवनात सुखाचे, समाधानाचे क्षण यावेत. त्यासाठीच आम्ही धोरण आखतो आणि त्यावरच काम करतो. राज्याचा विकास हेच आमचे महाराष्ट्रासाठीचे व्हिजन आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.**

एबीपी माझा वृत्त वाहिनीच्यावतीने आयोजित 'निवडणुकीआधी चर्चा उद्याच्या महाराष्ट्राची' या विशेष कार्यक्रमात एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक यांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांची मुलाखत घेतली. या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.

सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवूनच आम्ही काम करत आहोत, असे नमूद करून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, 'आमचे शासन येताच जनतेच्या हिताचे प्रकल्प सुरु केले. मग तो मेट्रो कारशेडचा प्रकल्प असेल किंवा अन्य महत्वाकांक्षी प्रकल्प. महाराष्ट्राच्या सर्वदूर भागात आज विकास कामांची घौडदोड सुरु आहे. महाराष्ट्र हे पायाभूत सुविधांच्या प्रकल्पाच्या बाबतीत देशातील पहिल्या क्रमाकांच राज्य आहे.

यात शिवडी न्हावा- शेवा अटल सेतू, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे शी संबंधित मिसींग लींक, मेट्रोचे ३३७ किलोमीटरचे जाळे, वर्सोवा ते पालघर पर्यंतचे तीन कोस्टल रोड, जे ठाणे, रायगड आणि पालघर यांना जोडणारे आहेत. या सर्व प्रकल्पांतून सामान्य जनतेला फायदा होणार आहे. त्यांच्यासाठी हे प्रकल्प गेमचेंजर ठरणार आहेत. समृद्धी महामार्गामुळे शेतमाल वेगाने शहरात पोहचवता येणार आहे. हे सर्व पर्यावरणपूरक व्हावेत, लोकाभिमुख व्हावेत असाच प्रयत्न केल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

शपथविधीनंतरच्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील सिंचन प्रकल्पांची कामे मार्गी लावण्यास, जलयुक्त शिवार अभियानाला गती देण्याचा आणि शेतकरी हिताचे निर्णय घेण्यास प्राधान्य देण्याचा निर्णय घेतल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, मराठवाडा वॉटर ग्रीडचा प्रकल्प गुंडाळून ठेवण्यात आला होता, त्याला आपण गती दिली. राज्यात आता १२० सिंचन प्रकल्प मार्गी लावले आहेत, त्यामुळे सुमारे १२ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

देशाला फाईव्ह ट्रीलियनची अर्थव्यवस्था बनवण्याचे स्वप्न देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डोळ्यासमोर ठेवले असून त्यात एक ट्रीलियन डॉलरची भर महाराष्ट्र टाकेल, त्यासाठी राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात असल्याचे मत यावेळी व्यक्त केले. महिला, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी सर्वांना न्याय देणारे लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, महिला सक्षमीकरणासाठी आपण अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले, लेक लाडकी लखपती, महिलांना एसटी बस प्रवासासाठी पन्नास टक्के सवलत दिल्याने त्यांच्या अनेक गोष्टी सुलभ झाल्या. यातूनच आमच्या विकासाचा लाभ त्यांच्यापर्यत पोहचल्याचे आपण पाहतोय.

शासन आपल्या दारी, कौशल्य विकास आणि नमो महारोजगार मेळाव्यातून आपण थेट नागरिकांपर्यंत पोहचत आहोत. पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण आणि आरोग्य, कौशल्य विकास या क्षेत्रातील आमुलाग्र बदल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांचे अपग्रेडेशन करणे सुरू आहे. आता पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत मिळतील, अशी व्यवस्था निर्माण केली आहे. गुंतवणुकीच्या क्षेत्रातही महाराष्ट्राची जगभर उद्योगस्नेही आणि मनुष्यबळ, कायदा-सुव्यवस्था या दृष्टीने चांगली राज्य अशी ओळख आहे. गतवेळी आपल्याला दावोस येथील परिषदेतून एक लाख ३७ हजार कोटींची गुंतवणूक मिळाली होती. यंदा तीन लाख ७३ हजार कोटींचे गुंतवणूक करार करण्यात यश आले आहे. यातूनही लाखो रोजगार संधी उपलब्ध होणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

'आपला महाराष्ट्र, आपलं व्हिजन' अशी भूमिका घेऊन आम्ही काम करत आहोत. यातून महाराष्ट्रातील जनतेच्या जीवनात सुखाचे, समाधानाचे क्षण यावेत, असेच धोरण आखतो आहोत, त्यासाठीच आम्ही काम करत आहोत. विकास हेच आमचे व्हिजन आहे, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी मराठा समाजाला दिलेले आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकेल असेही ठामपणे सांगितले. या आरक्षणामुळे अन्य कुठल्याही समाजावर, ओबीसींवर अन्याय होणार नसल्याची भूमिकाही त्यांनी मांडली.

# कवियत्री शांता शेळके सभागृहाच्या उर्वरित कामांसाठी ३ कोटी रुपये देणार

**पुणे, : अवसरी खुर्द येथील कवियत्री शांता शेळके सभागृहाच्या उर्वरित कामांसाठी लागणारे ३ कोटी रुपये मंजूर करण्यात येईल. तसेच शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय व शासकीय तंत्रनिकेतन येथे विद्यार्थ्यांना दर्जे दार शिक्षण मिळण्यासाठी मागणीच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करावेत, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.**

अवसरी खुर्द येथील शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय व शासकीय तंत्रनिकेतन येथील 'कवियत्री शांता शेळके' सभागृहाच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, पुणे म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण पंकज देशमुख, माजी आमदार पोपटराव गावडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर, उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, कार्यकारी अभियंता रावबहादूर पाटील, तहसीलदार संजय नागटिळक, तंत्र शिक्षण विभागाचे सह संचालक दत्तात्रय जाधव आदी उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, मराठी साहित्य क्षेत्रात मनाचा तुरा रोवणाऱ्या कवियत्री



शांता शेळके यांचा जन्म इंदापूर तालुक्यात झाला. त्यांचे बालपण जिल्ह्यासह मंचर परिसरात गेले. तालुक्याच्या याठिकाणी ज्ञान, गुण, कौशल्यवृद्धीसाठी चर्चा, ज्ञान, संवाद, परिसंवाद, व्याख्यान, परिषद अशा प्रकारच्या सांस्कृतिक केंद्राची गरज लक्षात घेऊन शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय व शासकीय तंत्रनिकेतन परिसरात 'कवियत्री शांता शेळके' यांच्या नावाला साजेसे अत्याधुनिक आणि अतिशय सुंदर असे १ हजार आसन क्षमतेचे सभागृह उभारण्यात आले आहे. सभागृहाचे उद्घाटन आपल्या जीवनात आनंदाचा, अभिमानाचा आणि कर्तव्यापूर्तीचा क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.

सभागृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगातील कलागुणांना वाव मिळेल. त्यांना चांगल्या व्यक्तींचे विचार ऐकता येईल आणि त्यांच्या ज्ञानात भर पडण्यास मदत होणार आहे. कवियत्री शांता शेळके यांच्या नावाला साजेसे कार्यक्रम या ठिकाणी आयोजित करावेत. तसेच सभागृह व परिसर स्वच्छ महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांने काळजी घ्यावी,असे आवाहन श्री.पवार यांनी केले.

आंबेगाव परिसराचा विकास करण्यासोबत सर्व जाती धर्मात जातीय सलोखा राखण्यासाठी सहकार मंत्री श्री. वळसे पाटील गेली अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहेत. परिसरात विविध विकासकामे चालू असून याचा येथील नागरिकांना लाभ होईल, असेही उमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले.

मंत्री श्री. वळसे पाटील म्हणाले, अवसरी खुर्द परिसरात अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या रूपात वैभव उभे आहे. आज हे एकमेव महाविद्यालय गावाच्या ठिकाणी उभे आहे. आज या ठिकाणी वेगवेगळे संशोधन होत आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सभागृहाची आवश्यकता लक्षात घेता हे सभागृह उभारण्यात आले आहे.

काळाच्या ओघात दर्जेदार शिक्षण देणारे महाविद्यालय टिकले असून ते चांगले दर्जेदार विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. या महाविद्यातून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी देश विदेशात नोकरी करत आहे. आजच्या काळामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा उपयोग नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय सुरू करून स्वतःबरोबर कुटुंबाचा उदरनिर्वाह केला पाहिजे, असे श्री. वळसे पाटील म्हणाले.

पुणे म्हाडाचे अध्यक्ष श्री. आढळराव पाटील, सह संचालक श्री.जाधव आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डी. पानगव्हाणे यांनी विचार व्यक्त केले.

### वंचितांनी उच्च शिक्षण, संशोधन आणि कौशल्य विकास या त्रिसूत्रींवर भर द्या - राज्यपाल रमेश बैस

पुणे : देशाची आर्थिक आणि सामाजिक विकासाची मजबूत



पायाभरणी करण्यासाठी उच्च शिक्षणाला महत्व असून त्यासाठी विद्यापीठांनी समाजातील वंचित घटकांपर्यंत उच्च शिक्षण पोहोचविणे, संशोधन आणि कौशल्य विकास या त्रिसूत्रीवर भर द्यावा, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

हॉटेल ग्रॅण्ड शेरेटन येथे 'भारताला विकसित राष्ट्र बनविण्यात उच्च शिक्षणाची भूमिका-भारत२०४७' या विषयावर आयोजित राष्ट्रीय संमेलनात ते बोलत होते. कार्यक्रमाला एज्युकेशन प्रमोशन सोसायटी ऑफ इंडियाचे डॉ. एम.आर.जयरामण, डॉ. जी.विश्र्वनाथन, प्रा.मंगेश कराड, डॉ. प्रशांत भल्ला, डॉ. एच.चतुर्वेदी आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री.बैस म्हणाले, शाश्र्वत आर्थिक विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्यास विकसित भारताचे उद्दीष्ट गाठता येईल. शिक्षणाच्या क्षेत्रात आपण कुठे आहोत याचे चिंतन करण्याची हीच योग्य वेळ आहे. भारतातील विद्यार्थी विकसित राष्ट्रातील विद्यापीठांमध्ये का प्रवेश घेतात याचाही विचार करणे गरजेचे आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंगच्या काळात शिक्षण क्षेत्रात वेगाने बदल पहायला मिळतील. अशा परिस्थितीत विद्यार्थी, प्राध्यापक आणि अभ्यासक्रमाचे आदान-प्रदान करण्यासाठी जगातील उत्तम विद्यापीठांसोबत आपल्याला जोडून घ्यावे लागेल. देशातील विद्यापीठात संशोधनाकडे दुर्लक्ष होत असून संशोधनावर अधिक भर देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यपाल श्री. बैस म्हणाले, राष्ट्रीय शिक्षण धोरणात २०३५ पर्यंत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ५० टक्क्यापर्यंत नेण्याचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दीष्ट गाठण्यासाठी विद्यापीठांना समजातील वंचित, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास, दिव्यांग, एलजीबीटीक्यू आदी घटकांपर्यंत पोहोचावे लागेल. आर्थिक अडचणींमुळे कोणीही उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी प्रयत्न करावे लागतील. नोकरी करणारे, गृहिणी, बंदिजन, शिक्षणापासून दूर झालेल्या व्यक्तींपर्यंत मुक्त शिक्षण पोहोचवावे लागेल, असे राज्यपाल म्हणाले.

आज बरेच विद्यार्थी रोजगार मिळावा यासाठी शिक्षण घेतांना दिसतात. आपला पारंपरिक अभ्यासक्रम रोजगारासाठी कौशल्य उपलब्ध करून देण्यास पुरेसा नसल्याने त्यात बदल करून कौशल्य शिक्षणावर भर देण्याची गरज आहे. १२ वी नंतर कौशल्य शिक्षण हेच खरे उच्च शिक्षण असून विद्यापीठांनी अशा अभ्यासक्रमांची रचना करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे सहकार्य घ्यावे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी समावेशक, न्यायसंगत आणि परिवर्तनकारी अभ्यासक्रमाची रचना विद्यापीठांनी करावी, असे आवाहन श्री.बैस यांनी केले. विद्यार्थी नवोन्मेषक, उद्योजक आणि नोकरी निर्माण करणारे व्हावेत यादृष्टीने नवी शिक्षण पद्धती विकसित करण्यावर शिक्षणतज्ज्ञ, नीति निर्धारण करणारे आणि शिक्षण प्रवर्तकांनी भर द्यावा, अशी अपेक्षाही राज्यपाल श्री. बैस यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. जयरामन, श्री. विश्र्वनाथन, श्री.चतुर्वेदी आणि प्रा.कराड यांनीही विचार व्यक्त केले.

### लातुरातील जुना औसा रोडवर महाशिरात्री निमित्ताने ब्रह्मा कुमारीज तर्फे श्री रामेश्वरम झांकी

-राजयोगिनी ब्रह्मा कुमारी नंदा यांची पत्रकार परिषदेत माहिती

लातूर - प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरिय विश्व विद्यालय, शाखा लातूरच्यावतीने महाशिरात्रीच्या निमित्ताने रामेश्वरमची भव्य चाळीस फूट उंचीची झांकी उभी करण्यात येत आहे . झांकीचे दर्शन सर्वांसाठी ७ ते १७ मार्च असे दहा दिवस असणार आहे. ही झांकी ब्रह्मा कुमारी चौक, जुना औसा रोड, राजयोग भवनच्या समोर, लातूर येथे उभी केली जात आहे. या झांकीचे इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्डस् मध्ये नाव नोंद होऊ शकते अशी आकर्षक झांकी असणार आहे. त्यामुळे, सर्वांनी आपल्या मित्र व सह परिवारासह दर्शन घ्यावे असे आवाहन राजयोगिनी ब्रह्मा कुमारी नंदा यांनी आज ४ मार्च रोजी दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान आयोजित पत्रकार परिषदेत केले आहे. ब्रह्मा कुमारीज ८८ वी त्रिमूर्ति शिव जयंती महोत्सव साजरा करत आहे.

# डॉ.भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते सांची बुद्ध विहाराच्या कोनसिलाचे अनावरण

माजलगाव (प्रतिनिधी)येथील भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या वतीने उभारण्यात आलेल्या माजलगाव शहरापासुन जवळच आसलेल्या सांची बुद्ध विहार डॉ.आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे २७/२/२०२२ रोजी तत्कालीन तालुका अध्यक्ष के.व्ही. साळवे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य अशी तथागत भगवान गौतम बुद्ध यांची मुर्ती प्रतिष्ठापित केली होती.

त्या मुर्तीचे शुशोभिकरणाचे काम अपुर्ण होते.भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा अध्यक्ष आद.कमलताई डोंगरे,जिल्हा महिला सरचिटनिस शोभाताई भोजने,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,जिल्हा पर्यटन सचिव के.व्ही.साळवे,जिल्हा संघटक बी.सी.डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय बौद्ध महासभा माजलगाव पदाधिकारी यांनी त्याचे शुशो भिकरण पुर्ण करुन त्या ठिकाणी कोनशिला बसवण्यात आली.दि.३ मार्च २०२४ वार रविवार रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातु भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष, समता सैनिक दलाच्या चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या भव्य मुर्तीचे



दिपाने,धुपाने,पुष्पाने,पुजन करुन कोनशिलाचे अनावरण करण्यात आले.यावेळी भिमराव साहेबांचे सांची बुद्ध विहार प्रांगणात डॉ.भिमराव यशवंत आंबेडकर साहेबांचे धम्म उपासिकांनी पुष्प वृष्टी करत भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी बहुजन विकास मोर्चा चे अध्यक्ष बाबुराव पोटभरे,भारतीय बौद्ध महासभा राज्य संघटक प्रा.बापुसाहेब गायकवाड,भारतीय बौद्ध महासभा विभागीय संघटक व्ही.एन.निसर्गंध ,लातुर पश्र्चिम जिल्हाअध्यक्ष बलांडे सर,बीड पुर्व जिल्हाअध्यक्ष बी.बी.धन्वे सर,बीड पश्र्चिमचे जिल्हा अध्यक्ष महालिंग निकाळजे,समता सैनिक दलाचे मेजर कॅ.राजाभाऊ आठवले, प्रकाश खळगे,सुभाष घनघाव सर,शेलापुरीच्या उपसरपंच शुशीलाताई घडसे,सदाशिव भालेराव, पत्रकार सुहास बोराडे,रवि उघडे,हरिभाऊ साळवे,मिलिंद गायकवाड,नाथाजी घडसे सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी धम्म उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

या साठी भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे संस्कार उपाध्यक्ष डॉ.भागवत साळवे,पर्यटन उपाध्यक्ष डी.एस.साळवे,संरक्षण उपाध्यक्ष प्रकाश साळवे,महिला उपाध्यक्षा लिलाताई उजगरे,संस्कार सचिव दयानंद साळवे ,महिला सचिव शारदाताई तांगडे,संरक्षण सचिव विषाखाताई वाघमारे,रेखाताई भारसकर, मायाताई स्वामी,मोहनराव काकडे,भानुदास साळवे,अनुराधा साळवे,मंदाताई साळवे, सिद्धार्थ खिल्लारे,बौद्धाचार्य डी. पी.वाघमारे,डि. पी.पोटभरे,बाबासाहेब घनघाव,किरण साळवे, राजाभाऊ साळवे,भगवान डोंगरे,नितिन डोंगरे, मडोधरी खंदारे,रोहिणी जावळे,अम्रपाली साळवे, सुदामतीताई जावळे,सिमा साळवे,वृंदावनी साळवे,राधाबाई भाग्यवंत,कलावतीताई पोटभरे, प्रभावती वाघमारे,प्रणीता साळवे,कुशिवर्ता साळवे,वैभव साळवे,पुष्पाताई काकडे,मायाताई बागुल,दैवशाला साळवे,संभाजी धाईजे,कोमल डोंगरे,पुजा सिरसट यांनी परिश्रम घेतले.

# लातूर जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवाराचा आगामी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार

लातूर : जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला जिल्हा रूग्णालयाचा प्रश्न गत १२ वर्षांपासून प्रलंबित आहे. यासाठी माझं लातूर परिवाराने आता आक्रमक भूमिका घेतली असून जोपर्यंत जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन होत नाही तोपर्यंत आगामी लोकसभा निवडणूक आणि नंतरच्या कोणत्याही निवडणुक प्रक्रियेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांना आरोग्य सेवा पुरविणे हे शासनाचे कर्तव्य आहे मात्र या मुलभूत सेवेपासून लातूर जिल्ह्याची सर्वसामान्य जनता एका तपापेक्षा अधिक काळापासून वंचित आहे. लातूरकरांच्या या प्रमुख मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माझं लातूर परिवाराने २ ऑक्टोंबर २०२३ रोजी शहरातील गांधी चौकात बेमुदत साखळी उपोषण सुरू केले. या उपोषणाला माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी खासदार डॉ सुनिल गायकवाड, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, ड. दिपक सुळ, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजी आमदार वैजनाथ शिंदे, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्यासह सर्वच राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी, विविध सामजिक संघटना, संस्था यांनी जाहीर पाठिंबा दिला होता. या उपोषणाची दखल घेत शासन दरबारी हा प्रश्न एका महिन्यात सोडविण्याचे आश्वासन जिल्हा प्रशासन आणि शासनाचे प्रतिनिधी म्हणून आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यु पवार यांनी उपोषणस्थळी येऊन दिले होते तेंव्हा माझं लातूर परिवाराने हे साखळी उपोषण ६ व्या दिवशी म्हणजेच ७ ऑक्टोबर २०२३ रोजी तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १९ ऑक्टोबर २०२३ रोजी मुंबईत मंत्रालयात जावून माझं लातूरचे शिष्टमंडळ आरोग्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, उद्योगमंत्री तसेच जिल्ह्यातील लोक प्रतिनिधींची भेट घेत निवेदन सादर करून हा प्रश्न सोडवण्यासाठी साकडे घातले. मुख्यमंत्री कार्यालयाशी संपर्क साधून पत्र व्यवहारही सुरू केला. जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना अनेकदा भेटून पाठपुरावा करावा अशी विनंती केली होती. सलग ५ महिने पाठपुरावा करून देखील सर्व सामान्य जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या आणि मुलभूत प्रश्नावर शासन गंभीर नाही असेच यातून स्पष्ट होत आहे. शासनाच्या या वेळकाढू धोरणाचा निषेध करण्यासाठी आता माझं लातूर आक्रमक झाले असून जोपर्यंत जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन होत नाही तोपर्यंत आगामी लोकसभा, तसेच यापुढील सर्वच निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जिल्हा रुग्णालयाचा प्रश्र्न मार्गी लावून त्वरित भूमिपूजन करावे अशी विनंती मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, आरोग्यमंत्री यांना पत्र पाठवून केली आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व सुज्ञ मतदारांनी येणाऱ्या निवडणुकीवर बहिष्कार टाकावा यासाठी लवकरच जिल्हाभरात मोहीम हाती घेण्यात येणार असल्याचे माझं लातूर परिवाराच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# डव्हान्टेज चंद्रपूर २०२४ -इंडस्ट्रियल एक्स्पो अँड बिझनेस कॉन्क्लेव्ह'चे उद्घाटन

**मुंबई, : देशाच्या विकासात आता चंद्रपूर महत्त्वाची भूमिका निभावणार असून डव्हान्टेज चंद्रपूरच्या माध्यमातून लक्ष्मी मित्तल ग्रुपसह १९ कंपन्यांशी सामंजस्य करार केले गेले आहेत. चंद्रपूर प्रशासन या सर्व कंपन्यांच्या पाठीशी पूर्ण उभे राहून केवळ चंद्रपूरच नाही तर देशाच्या विकासातही हातभार लावेल, असे प्रतिपादन वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. 'देश के निर्माण में चंद्रपूर मैदान में' असे सांगून देशविकासाच्या कार्यात चंद्रपूर महत्वाची भूमिका बजावेल, असे त्यांनी यावेळी सांगितले.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जिल्हा प्रशासन, एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन, चंद्रपूर व असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'डव्हांटेज चंद्रपूर २०२४ – इंडस्ट्रियल एक्स्पो अँड बिझनेस कॉन्क्लेव्ह' चे सोमवारी वन अकादमी येथे उद्घाटन झाले.

त्यावेळी मंत्री श्री मुनगंटीवार बोलत होते. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह आमदार किशोर जोरगेवार, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, सीईओ विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालिवाल न्यू ईरा व्यवस्थापकीय संचालक बाळासाहेब दराडे, लॉईडचे मधूर गुप्ता, कुमार वार, राकेश प्रसाद, राजेश झंझाड, जी. डी. कामडे, आलोक मेहता, के. जी. खुबाटा, मधुसूदन रुंगटा उपस्थित होते.

मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, चंद्रपूर हे आतापर्यंत कोळसा, सिमेंट यासाठी ओळखले जात होते. येथे स्थापन झालेले उदयोग भविष्यात अधिक प्रगती करतील. त्याचा लाभ स्थानिक परिसराला होईल. करार झालेल्या कंपन्यांच्या विविध परवानगींसाठी 'वन विंडो सिस्टीम' तयार करण्यासोबतच एअरपोर्ट, रेल्वे, रस्ते आदी पायाभूत सुविधा, कौशल्य विकासाचे विविध अभ्यासक्रम, संशोधन कार्यक्रमांवर भर दिला जाणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

मंत्री श्री. लोढा यांनी श्री. मुनगंटीवार यांच्या कार्याचे कौतुक केले. आ. किशोर जोरगेवार यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी ॲडव्हांटेज विदर्भ व चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा प्रशासनाने विविध कंपन्यांशी केलेल्या सामंजस्य करारासंदर्भात माहिती दिली. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी चंद्रपूर जिल्ह्याच्या



सामाजिक, औद्योगिक व आर्थिक विकासाबद्दल विस्तृत सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डव्हान्टेज चंद्रपूर २०२४ बद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे शुभेच्छा संदेश दाखवण्यात आले. डव्हान्टेज चंद्रपूर २०२४ संदर्भात एक चित्रफीत दाखवण्यात आली.

डव्हान्टेज चंद्रपूर २०२४ साठी राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि केंद्र शासनाच्या एमएसएमई मंत्रालयाचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर व श्यामल देशमुख यांनी केले.

५० वर्षांचे व्हिजन तयार करा – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

चंद्रपूर जिल्ह्याच्या क्षमता आणि कमतरता या बाबींचा विचार करून या जिल्ह्याच्या विकासासाठी, जिल्ह्याला समृद्ध व संपन्न करण्यासाठी पुढील ५० वर्षांचे व्हिजन तयार करावे, अशा सूचना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्हिडिओ संदेशातून केल्या. चंद्रपूरमध्ये ॲडव्हेंचर स्पोर्ट्स, वॉटर स्पोर्टस, पर्यटन, पर्यटकांसाठी इलेक्ट्रीक गाड्या, रिसॉर्टस, बांबू लागवड, मत्स्यव्यवसाय यावर काम करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

चंद्रपूरमध्ये स्टील प्लांट उभारणार – अलोककुमार मेहता

लक्ष्मी मित्तल ग्रुपचे संचालक (मायनिंग अँड स्ट्रॅटेजिक प्रोजेक्ट) अलोक कुमार मेहता यांनी महाराष्ट्रात येऊन सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्याची संधी मिळाल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. चंद्रपूरमध्ये ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून स्टील प्लांट स्थापन करण्यात येणार असून त्या माध्यमातून ६० हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती केली जाईल, असे ते म्हणाले. मधुसुदन रुंघटा यांनीही मनोगत व्यक्त केले.

१९ सामंजस्य करार, ७५ हजार ७२१ कोटींची गुंतवणूक

'ॲडव्हांटेज चंद्रपूर'च्या उद्घाटन सत्रात लक्ष्मी मित्तल ग्रुपसह एकुण १९ सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये सुमारे ७५ हजार ७२१ कोटी रुपयांचे करार करण्यात आले ज्या द्वारे या भागात ५० हजारहून अधिक रोजगार निर्माण होणार आहेत. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी जिल्हा प्रशासनाच्यावतीने या करारावर स्वाक्षरी केली. या विविध करारांवर आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया लिमिटेडचे अलोककुमार मेहता, न्यू ईराचे व्यवस्थापकीय संचालक बाळासाहेब दराडे, लॉईड मेटल्सचे मधूर गुप्ता, चंद्रपूर सोलारचे राजेश ओसवाल, अंबुजा सिमेंट के. सुब्बलक्ष्मणन, अरविंदो रिॲलिटी इन्फ्रोस्ट्रक्चर प्रा. लि. संजय मिश्रा, राजुरी स्ट्रीलसचे विपीन जैन व विवेक गुप्ता, सनफ्लॅग अँड स्टील कंपनी लिमिटेडचे एस. महादेवन अय्यर, अल्फालॉजिक टेक्सेस लिमिटेडचे अंशु गोयल, वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड हर्षल दातार, अल्ट्राटेक एसीसीचे अतुल कंसन, डेस्टीनो मिनरल्सचे मोरेश्वर झोडे, एसआयएडी युएसएचे उमेश दिघे व अनंत एव्हियेशनचे संचालक यांनी स्वाक्षरी केल्या.

मान्यवरांच्या हस्ते यावेळी भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये कोळसा खाणी, खनिज, लोह – पोलाद, बांबू, मत्स्यव्यवसाय, पर्यटन सोबतच पुरवठा, डेअर, ग्रीन एनर्जी, रिअल इस्टेट, वाहन उद्योग, औषधनिर्माण अशा विविध क्षेत्राशी संबंधित सुमारे १५० स्टॉल्स आहेत. मान्यवरांनी यावेळी या प्रदर्शनाची पाहणी करून कौतुक केले.

## छोट्या उपसा सिंचन योजना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लाभदायक

नंदुरबार,(जिमाकावृत्त): जिल्ह्यातील



१८ धरणांवर १८ लघु स्वरूपाच्या उपसा सिंचन योजना जिल्हा परिषदेच्या सुरू करणार असून अशा छोट्या उपसा सिंचन योजना शेतकऱ्यांना मोठ्या लाभदायक ठरतील, असा विश्र्वास आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी व्यक्त केला आहे.

ते आज नंदुरबार तालुक्यातील शिरवाडे लघु उपसा सिंचन योजनेच्या भूमीपूजन प्रसंगी बोलत होते. यावेळी सरपंच रामसिंग नाईक (शिरवाडे) कोयऱ्या वळवी(वडझाकन), उपसरपंच संजय गावित, कार्यकारी अभियंता, उप अभियंता वाय. एम. गायकवाड, टी. के. ठाकरे, कार्यकारी अधिकारी सुरेश भापकर, पंचक्रोशीतील अधिकारी, पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री डॉ. गावित म्हणाले, शिरवाडे उपसा सिंचन योजनेमुळे सुमारे १०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. धरणाच्या खालच्या बाजूस पाटामुळे पाणी पोहचते, या उपसा सिंचन योजना धरणांच्या वरच्या बाजूस जाणीवपूर्वक निर्माण केल्यामुळे धरणाच्या वरच्या बाजूस कोरड शेतजमिनींनाही त्याचा लाभ होणार आहे.

ते पुढे म्हणाले, नंदुरबार जिल्ह्यात लहान, मोठ्या धरणांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शिवाय जल्ह्यातून तापी व नर्मदा या मोठ्या नद्या वाहतात. परंतु नंदुरबार जिह्यातील बऱ्याच भागात सिंचन सुविधांचा अभाव आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होत नव्हते. नंदुरबार जिल्ह्यातील १००% लहान मोठ्या धरणातुन व तापी नर्मदा नदी लगत ज्या ठिकाणी शक्य आहे. त्याठिकाणी लहान मोठ्या उपसा सिंचन योजना, साठवण बंधारे, सी.एन.बी. च्या माध्यमातुन मोफत सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देणे हे स्वप्न होते. ते आज साकार होतांना दिसत आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील उपसा सिंचन योजनाची सुरुवात शिरवाडे उपसा सिंचन योजनेपासुन होत आहे. आस्था फाऊंडेशन नंदुरबार या सेवा भावी संस्थेच्या पुढाकाराने शिरवाडे आदिवासी सहकारी उपसा सिंचन संस्था, शिरवाडे ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातुन इतर देखील उपसा योजनांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले आहेत. लवकरच नंदुरबार जिल्हयातील सर्व लहान मोठे धरणे तापी व नर्मदा नदी वरुन इतर शेतकऱ्यांना उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातुन सिंचन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचेही यावेळी मंत्री डॉ. गावित यांनी सांगितले.

थोडक्यात महत्वाचे

शिरवाडे आदिवासी सहकारी उपसा जलसिंचन योजनेच्या माध्यमातुन शिरवाडे गावातील ४७ लाभार्थ्यांना एकुण ४९.९ हेक्टर क्षेत्रास, वडझाकण गावातील ३९ लाभार्थींना एकुण ३७.९६ हेक्टर क्षेत्रास व रनाळे गावातील ६ लाभार्थींना एकुण १२ हेक्टर क्षेत्रावरील ९२ लाभार्थींच्या एकुण ९९.८६ हे. क्षेत्रास गावालगत असेलेल्या शिरवाडे लघुपाठ तलावातील उपसा सिंचनाद्वारे पाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या योजनेसाठी एकुण ३.२० कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या योजनेमुळे धरणातील पाण्यापासुन वंचित असलेल्या शेतकऱ्यांना जे फक्त पावसाच्या पाण्यावरती अवलंबुन होते त्यांना बारमाही पाण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन खऱ्या अर्थाने त्यांच्या जीवनात समृद्धी येणार आहे.

## माजलगाव पोलीसांनी गंभीर गुन्ह्यातील चौघांना केली अटक

माजलगाव (प्रतिनिधी) : धर्मांतराच्या मुद्यावरून दोन तरूणांना बेदम मारहाण केल्याची घटना दि.१४ डिसेंबर २०२३ रोजी घडली होती.

या प्रकरणात माजलगाव शहर पोलीस ठाण्यात ९ जणांविरूध्द मारहाणीसह ट्रॉसिटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.मात्र या प्रकरणातील आरोपी गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होते.

अखेर डीवाय एसपी धीरजकुमार – यांच्या टीमने इम्रान बशीर शेख,अल्ताफ बशीर शेख,तालेब बशीर शेख, अतिक बशीर शेख या चौघांना अटक केली आहे.यांचेवर आणखी मारहाणीच्या घटना आहेत.मात्र त्या पोलीसात दाखल करण्यात आल्या नाहीत.याबाबत परिसरात उलटसुलट चर्चा होत आहे.

# उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते आंबेगाव तालुक्यातील विविध विकास कामांचे उद्घाटन

पुणे, : राज्यातील पोलीस दल सक्षम करण्यासाठी त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पोलीस दलाला अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

आंबेगाव तालुक्यात मंचर येथील पोलीस ठाणे, पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे निवासस्थान, घोडेगाव येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे निवासस्थान, जुन्नर–आंबेगाव उपविभागीय अधिकारी कार्यालय इमारतीचे लोकार्पण श्री.पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाला सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, पुणे म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण पंकज देशमुख, माजी आमदार पोपटराव गावडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर, उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, कार्यकारी अभियंता रावबहादूर पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नागनाथ यमपल्ले, तहसीलदार संजय नागटिळक, गट विकास अधिकारी प्रमिला वाळुंज, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक कैलास पाटील, तंत्र शिक्षण विभागाचे सह संचालक दत्तात्रय जाधव आदी उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, राज्याची कायदा व सुव्यवस्था राखत असतांना पोलीस दल विविध सण, उत्सव आणि अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्याच्यावेळी ऊन, थंडी, पाऊस, सुट्टीची पर्वा न करता ते आपले कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या सोबत त्यांचा परिवारांदेखील विविध अडीअडचणीना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांना चांगल्या सुविधा देणे गरजेचे असून त्यादृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.

पोलीस दलासाठी अत्याधुनिक पोलीस ठाणे, सुसज्ज निवासी वसाहती उभे करण्यात येत आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पुणे व



पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय तसेच जिल्हा ग्रामीण पोलीस दलाला वाहने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. पर्यावरणाचा समतोल साधतांना शासकीय इमारती आणि वसाहतीच्या ठिकाणी चांगल्याप्रकारे जागेचे सपाटीकरण करुन अधिकाधिक वृक्षारोपण करावे, परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन श्री.पवार यांनी केले.

मंचर येथील पोलीस ठाण्याच्या इमारतीकरीता ११ कोटी ५१ लाख रुपये, पोलीस अधिकारी व अंमलदार निवासस्थान इमारत १४ कोटी ८१ लाख रुपये, घोडेगाव येथे पोलीस अधिकारी आणि अंमलदार निवासस्थान इमारत १४ कोटी रुपये आणि जुन्नर–आंबेगाव उपविभागीय अधिकारी कार्यालय इमारतीकरीता २ कोटी ३४ लाख रुपये खर्च करुन आंबेगाव परिसराच्या वैभवात भर घालणाऱ्या इमारती उभारण्यात आल्या आहेत.

घोडेगाव येथील ४० खाटाचे ग्रामीण रुग्णालय व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थान इमारतीचे बांधकाम करण्यासाठी २७ कोटी २३ लाख रुपये, बस स्थानक इमारत पूर्णबांधणी करिता २ कोटी रुपये, शासकीय आदिवासी मुलींच्या वसतिगृह इमारतीचे तसेच गोहे, आहुपे आणि तेरूगंण येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेचे आदर्श शाळेत रूपांतरित करण्याचा प्रत्येकी ७ कोटी रुपये अशा सुमारे १२३ कोटी रुपये खर्च होणार आहे. यामुळे नागरिकांना चांगल्या सुविधा मिळतील.

शासनाच्यावतीनेबेरोजगार तरूणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी रोजगार मेळावे आयोजित करण्यात येत आहे. शेतकरीवर्गासोबत सर्व घटकांचे प्रलंबित प्रश्र्न मार्गी लावण्यात येतील, असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी श्री.पवार यांच्या हस्ते घोडेगाव येथील ग्रामीण रुग्णालय व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थान आणि बस स्थानक इमारत, शासकीय आदिवासी मुलींच्या वसतिगृह इमारतीचे तसेच गोहे, आहुपे आणि तेरूगंण येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेचे आदर्श शाळेत रूपांतरित करण्याचा कामांचे ई–भूमीपूजन करण्यात आले.

## ग्रामीण जीवनाचे राहणीमान उंचावल्यास भारत लवकरच विकसित राष्ट्र होईल

लातूर : भारतातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात त्यांचे सर्वांगीण जीवनमान उंचावले तरच भारत विकसित राष्ट्र होईल असे प्रतिपादन कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सलग्नित राष्ट्रीय सेवा योजना, महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर आणि ग्रामपंचायत कार्यालय, जवळा बु. यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष युवक शिबिर मौजे जवळा बु. येथे आयोजित करण्यात आले आहे या शिबिरात कृषी मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपिठावर डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. व्यंकट दुडीले, कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके आदीची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. ठोंबरे म्हणाले की, देशाचे मानवी संसाधन, लोकसंख्या नैसर्गिक साधनसंपत्ती यांचा विनियोग झाला पाहिजे. देश विकासात मानवी संसाधनाचे विशेष महत्त्व असते. ग्रामीण जीवनात सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्थिती अत्यंत बिकट आहे. शहरे मोठी होत चालली आहेत आणि खेडी ओस पडत आहेत. ग्रामीण भागातील आहार विहाराचे अनेक प्रश्र्न सातत्याने भेडसावत आहेत अशा वेळेला शासनाने जाणीवपूर्वक ग्रामीण भागाकडे लक्ष केंद्रित करून त्यांचा विकासाचा ध्यास घेतला पाहिजे तरच आत्मनिर्भर भारताचे आणि विकसित राष्ट्राचे स्वप्न पूर्ण होईल असेही ते म्हणाले.

## मुक्ताईनगर ते रावेर तालुक्याला जोडणाऱ्या पुलाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन

जळगाव (जिमाका) : महाराष्ट्र शासनाचा शासन



आपल्या दारी हा उपक्रम लोकाभिमुख ठरला असून त्यातून चार कोटी लोकांना विविध लाभ मिळाले. सरकारने लेक लाडकी योजना, एस. टी. बसमध्ये महिलांना पन्नास टक्के सवलत दिली. शेतकऱ्यांना मदत करतांना एन.डी.आर.एफ नियमात बदल केल्याचे सांगून आता मुक्ताईनगर आणि रावेरला जोडणारा इथली भाग्य रेषा बदलणारा हा तापी नदीवरला पूल देत आहोत. तसेच संत मुक्ताईच्या पावनभूमीच्या पर्यटन विकासासाठी पन्नास कोटी रुपये देणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुक्ताईनगर तालुक्यातील मुंढोळदे (खडकाचे) व रावेर तालुक्यातील ऐनपुर येथील पुलाच्या भूमीपूजनानंतर झालेल्या जाहिर कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, आ. किशोरआप्पा पाटील, आ. संजय सावकारे, आ. चिमणराव पाटील, आ.चंद्रकांत पाटील, माजी आ. चंद्रकांत सोनवणे, माजी आ. दशरथ भांडे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित उपस्थित होते.

मुक्ताईनगरच्या या पुलामुळे ३० ते ३५ किलोमीटरचा वळसा वाचणार असून आता मुक्ताईनगर आणि रावेर जोडले जाणार आहे. हा पुल नाबार्ड कडून केला जाणार असल्याचे सांगून या पुलासाठी निधी कमी पडणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिली.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात सगळीकडे विकासाची कामं सुरु आहेत. शासन आपल्या दारी हा लोकाभिमुख उपक्रम राबविला जातो आहे. एका छताखाली सगळ्या गोष्टी मिळतायत, कोणाला ट्रॅक्टर मिळतय,कोणाला घर मिळतंय, कोणाला शेती अवजारे मिळतायत अशा अनेक योजनाचा थेट लाभ दिला जात आहे. उद्योगाच्या बाबतीतही शासनाने आघाडी घेतली असून पाच हजार कोटीचे नवे उद्योग राज्यात येत आहेत. त्यामुळे हजारो लोकांना रोजगार मिळणार आहे.

संत मुक्ताबाई यांच्या पावन भूमीच्या विकासासाठी पन्नास कोटी रुपये देणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. तालुक्यातील इतर विकासकामाचे जवळपास ७५ कोटी रुपयांच्या कामाचे आज मुख्यमंत्री यांनी उदघाटन केल्याचे जाहीर केले.

मंत्री अनिल पाटील आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, मुक्ताईनगर ते रावेरचे प्रवेशद्वार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वाद आणि मुक्ताईनगरचे आ. चंद्रकांत पाटील यांच्या प्रयत्नाचे यश असून आता मुक्ताईनगर बदलायला लागलं आहे.

यावेळी आ. चंद्रकांत पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना मुख्यमंत्री यांची कृतज्ञता व्यक्त केली. तापी नदीवरील हा पुल इथल्या जनतेसाठी किती महत्वाचा होता हे सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी घेतले संत मुक्ताबाईंच्या समाधीचे दर्शन

संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्र्वर, संत सोपानदेव यांच्या भगिनी संत मुक्ताबाई यांची समाधी ज्या मुक्ताईनगरमध्ये आहे त्या नगरीत आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आगमन झाले. सगळे कार्यक्रम आटोपल्या नंतर मुख्यमंत्र्यांनी संत मुक्ताबाई यांच्या समाधीचे दर्शन घेतले. साडीचोळी वाहिली आणि आरतीही केली.

## विष्णुदास कर्वा यांचे निधन आज लातुरात अंत्यसंस्कार

लातूर : लातूर येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते



सत्यनारायणजी कर्वा यांचे लहान बंधू व कर्वा उद्योग समूह व फायब्रो प्लास्टचे संचालक लक्ष्मीकांत कर्वा व योगेश कर्वा यांचे वडील विष्णुदास विठ्ठलदास कर्वा यांचे सोमवारी सायंकाळच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८९ वर्ष होते.

स्व. विष्णुदास कर्वा यांनी स्टेट बँक हैदराबादमध्येही प्रमुख रोखपाल म्हणून कार्य केले होते. ते अत्यंत मनमिळावू स्वभावाचे व धार्मिक वृत्तीचे होते. आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाच्या जीवनात त्यांच्या परिवार स्नेही प्रवृत्तीमुळे अमुलाग्र बदल झालेला आहे. लातुरातील धार्मिक, अध्यात्मिक, शैक्षणिक, औद्योगिक व सामाजिक क्षेत्रात कर्वा परिवाराचा सिंहाचा वाटा आहे. परिवारातील सर्व सदस्यांच्या या कार्यामागे प्रसिद्धिपराङमुख राहून प्रोत्साहनपर कार्य ते सतत करत आलेले आहेत.

राष्ट्रसंत स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांचे ते अनन्य भक्त होते. लातूर शहरातील त्यांच्या कथा, व्याख्यान माला आयोजनामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता.

स्व. विष्णुदास कर्वा यांची अंत्ययात्रा मंगळवारी, दि. ५ मार्च २०२४ रोजी सकाळी साडेदहा वाजता ' मधुकोश ' साईधाम या राहत्या घरापासून निघणार असून मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894